# शुद्धीपत्रक

## (पोलीस शिपाई चालक व पोलीस शिपाई पदाच्या लेखी परीक्षेसंदर्भात सुचना)

सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर सुरू असलेल्या पोलीस शिपाई चालक व पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेमध्ये शारीरीक चाचणीमधून लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा अनुक्रमे **दिनांक 26/03/2023 व 02/04/2023 रोजी** घेण्यात येणार आहे. सदर दोन्ही लेखी परीक्षांसाठी सकाळी 11.00 वाजताची वेळ देण्यात आली होती.

मात्र, मा. पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने यामध्ये अंशत: बदल करण्यात येत असून सुधारीत वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

**अ. पोलीस शिपाई – चालक भरती लेखी परीक्षा –**

- **दिनांक – 26/03/2023**
- **लेखी परीक्षेची वेळ सकाळी 08.00 ते 08.30 वा. दरम्यान**
- **उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर हजर राहण्याची वेळ – सकाळी 05.30 वाजता**
- **ठिकाण SVCS HIGH SCHOOL & JUNIOR COLLEGE (श्री वीरतपस्वी चन्नावीर शिवाचार्य हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज), एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर.**

**ब. पोलीस शिपाई भरती लेखी परीक्षा –**

- **दिनांक – 02/04/2023**
- **लेखी परीक्षेची वेळ सकाळी 08.00 ते 08.30 वा. दरम्यान**
- **उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर हजर राहण्याची वेळ – सकाळी 05.30 वाजता**
- **ठिकाण SVCS HIGH SCHOOL & JUNIOR COLLEGE (श्री वीरतपस्वी चन्नावीर शिवाचार्य हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज), एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर.**

**उमेदवारांसाठी सुचना -**

1. उमेदवारांनी परीक्षेसाठी येतांना शासकिय ओळखपत्र, महाआयटीकडून देण्यात आलेले प्रवेशपत्र व या कार्यालयाकडून शारीरीक चाचणीवेळी देण्यात आलेले पोलीस भरती ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे.
2. सर्व उमेदवारांनी वेळेमध्ये दिलेल्या ठिकाणी हजर राहणे बंधनकारक आहे. परीक्षा सुरू झाल्यानंतर आलेल्या उमेदवारांना कोणत्याही परीस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

3. उमेदवारांना पॅड व काळ्या शाईचे पेन परीक्षेवेळी या कार्यालयाकडून पुरविले जाणार असल्याने मुद्दा क्रमांक 2 मधिल नमूद कागदपत्रांव्यतिरीक्त इतर कोणतेही साहित्य परीक्षा केंद्रावर घेवून जाण्यास मनाई आहे.

1. उमेदवारांनी मोबाईल, स्मार्ट वॉच, गणकयंत्र, इतर कोणतेही ब्लुटूथ यंत्र जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे. तसे निदर्शनास आल्यास, अथवा उमेदवार इतर कोणत्याही बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करत असल्याचे आढळून आल्यास त्याचेवर कायदेशीर कारवाई केली जाईल व सबंधित उमेदवारास पुढील पोलीस भरती प्रकियेतून तत्काळ बाद केले जाईल.

**(अजित बोऱ्हाडे)**
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय
सोलापूर शहर